24 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अन्य अधिकारी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात शहिदांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या पवित्र स्मृतींना मंगळवारी अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी शहिदांच्या प्रतिमांना पुष्प वाहून आदरांजली व्यक्त केली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतींना अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

# विद्यापीठात शहिदांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतींना आज अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात शहीद दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनीही शहिदांच्या प्रतिमांना पुष्प वाहून आदरांजली वाहिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'आजादी का अमृतमहोत्सव' या उपक्रमांतर्गत आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी अवनीश पाटील, नीलांबरी जगताप, नमिता खोत, आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात 'आजादी का अमृतमहोत्सव'

## इतिहास विभाग : गुरुवारपर्यंत ग्रंथप्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने केंद्र सरकारच्या 'आजादी का अमृतमहोत्सव' या उपक्रमांतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील पुस्तकांचे प्रदर्शन छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रात आयोजित केले आहे. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

स्वातंत्र्यलढ्यात तेजस्वी कामगिरी बजावणाऱ्या महान नेतृत्वाविषयी उपलब्ध ग्रंथांचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, नीलांबरी जगताप, दत्तात्रय मछले, आदी उपस्थित होते. दरम्यान, या प्रदर्शनात नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधी यांच्या जीवनपटासह त्यांच्याविषयीच्या शंभरहून अधिक पुस्तकांची मांडणी केली आहे. हे प्रदर्शन गुरुवार (दि. २५)पर्यंत सुरू राहणार आहे.

### दुर्मीळ छायाचित्रे

'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये महात्मा गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने 'महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' या विषयावरील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. ते शनिवारपर्यंत (दि. २७) पाहण्यास खुले राहणार आहे.

2 4 MAR 2021

**सकाळ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महान नेत्यांचे आदर्श अंगिकारा

## डॉ. शिर्के; 'आजादी का अमृतमहोत्सवा'त पुस्तक प्रदर्शन

कोल्हापूर, ता. २३ : देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात तेजस्वी कामगिरी बजावणाऱ्या महान नेतृत्वांविषयी उपलब्ध ग्रंथांचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे. त्यांचा आदर्श अंगीकारण्याचा प्रयत्न करावा. तेव्हाच 'आजादी का अमृतमहोत्सव' हा उपक्रम खऱ्या अर्थाने सार्थक झाला असे म्हणता येईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.



**कोल्हापूर : नेताजी सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील पुस्तकांच्या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. अवनीश पाटील, डॉ. नमिता खोत आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे केंद्र सरकारच्या 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत आयोजित नेताजी सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील पुस्तकांच्या प्रदर्शनाच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रात त्याचे आयोजन केले आहे. डॉ. शिर्के म्हणाले, "प्रदर्शनातील पुस्तके पाहून विद्यार्थ्यांत ती वाचण्याची प्रेरणा जागृत होणे अधिक आवश्यक आहे. हा उपक्रम आयोजित करण्यामागील भूमिका तीच आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या विषयी तसेच स्वातंत्र्ययोद्‌ध्यांविषयी अधिविभागात तसेच ग्रंथालयात उपलब्ध विविध पुस्तकांचे वाचन करावे. नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधी यांच्या जीवनपटासह त्यांच्याविषयीच्या शंभरहून अधिक पुस्तकांची मांडणी प्रदर्शनात केली आहे. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. नीलांबरी जगताप, दत्तात्रय मछले उपस्थित होते. कोविडविषयक नियमांचे पालन करून प्रदर्शन गुरुवारपर्यंत (ता. २५) पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे. त्याचप्रमाणे 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत मानव्यशास्त्र इमारतीत महात्मा गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य या विषयावरील दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. ते शनिवारपर्यंत पाहण्यास खुले राहील.

2 4 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यलढ्यातील नेतृत्वांविषयी वाचन करा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात 'आजादी का अमृत महोत्सव'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यलढ्यात तेजस्वी कामगिरी बजावणाऱ्या महान नेतृत्वांविषयी उपलब्ध ग्रंथांचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे. त्यांचा आदर्श अंगिकारण्याचा प्रयत्न करावा. तेव्हाच 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम खऱ्या अर्थाने सार्थक होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : 'आजादी का अमृत महोत्सव' या उपक्रमांतर्गत नेताजी सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. अवनिश पाटील, डॉ. निलांबरी जगताप व डॉ. नमिता खोत आदी.

मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे केंद्र सरकारच्या 'आजादी का अमृतमहोत्सव' या उपक्रमांतर्गत 'नेताजी सुभाषचंद्र बोस आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील पुस्तकांचे प्रदर्शन' छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रात आयोजित करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, प्रदर्शनातील पुस्तके पाहून विद्यार्थ्यांमध्ये ती वाचण्याची प्रेरणा जागृत होणे अधिक आवश्यक आहे. किंबहुना, हा उपक्रम आयोजित करण्यामागील भूमिका तीच आहे. यावेळी कुलगुरूंनी प्रदर्शनात मांडलेल्या पुस्तकांची पाहणी केली. या प्रसंगी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. नीलांबरी जगताप, दत्तात्रय मछले यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन

कोविडविषयक नियमांचे पालन करून सदर प्रदर्शन गुरुवार (दि. २५) पर्यंत पाहण्यासाठी उपलब्ध राहणार आहे. त्याचप्रमाणे 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत मानव्यशास्त्र इमारतीमध्ये महात्मा गांधी अभ्यास केंद्रातर्फे 'महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' या विषयावरील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. ते सुद्धा शनिवारपर्यंत (दि. २७) पाहण्यास खुले राहणार आहे.

जनसंपर्क कक्ष

2 4 MAR 2021

पुढारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यलढ्यातील महान नेतृत्वांचे आदर्श अंगीकारण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; आजादी का अमृत महोत्सव ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात तेजस्वी कामगिरी बजावणाऱ्या महान नेतृत्वांविषयी उपलब्ध ग्रंथांचे विद्यार्थ्यांनी वाचन करावे. त्यांचा आदर्श अंगीकारण्याचा प्रयत्न करावा. तेव्हाच 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम सार्थक झाला असे म्हणता येईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

इतिहास अधिविभागातर्फे केंद्र सरकारच्या आजादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत 'नेताजी सुभाषचंद्र बोस व सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील पुस्तक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या विषयी, स्वातंत्र्ययोद्ध्यांविषयी अधिविभागात, ग्रंथालयात उपलब्ध विविध पुस्तकांचे वाचन करावे. त्यावर मनन, चिंतन करावे आणि त्याविषयीचे आकलन वाढवावे, हे उपक्रमातून अभिप्रेत आहे.

उद्घाटनानंतर कुलगुरूंनी प्रदर्शनात मांडलेल्या पुस्तकांची पाहणी केली. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. निलांबरी जगताप, दत्तात्रय मछले उपस्थित होते.

महात्मा गांधी अभ्यास केंद्रातर्फे 'महात्मा गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्य' विषयावरील दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले असून, शनिवारपर्यंत ते खुले राहणार आहे.

### शंभरहून अधिक पुस्तकांची मांडणी

नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार वल्लभभाई पटेल व महात्मा गांधी यांच्या जीवनपटासह त्यांच्याविषयीच्या शंभरहून अधिक पुस्तकांची मांडणी प्रदर्शनात केली आहे.